# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.१९९/२०२५

**विषय :-** विद्यापीठ आस्थापनेतील शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवक (कार्यरत/सेवानिवृत्त) यांचेकरिता नवीन ओळखपत्राबाबत.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र.२४८/२०२४, जा.क्र.एएन/३७२६, दिनांक ०९/१०/२०२४ अन्वये यापूर्वी नवीन ओळखपत्राबाबत कळविण्यात आलेले होते. मात्र बहुतांश शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी उक्त माहिती अद्यापपर्यंत सबमिट केलेली नाही, त्या अनुषंगाने विद्यापीठातील उर्वरित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांचे (कार्यरत/सेवानिवृत्त) नवीन ओळखपत्र तयार करावयाचे आहेत. याकरिता उर्वरित सर्व संबंधितांनी विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या लिंकद्वारे **Human Resource Management System – For Employee** येथे जाऊन **Login** मधून **Online** पध्दतीने आपली सर्व माहिती सदर परिपत्रक प्रसिध्द झाल्यापासून **दहा दिवसांच्या आत** भरावयाची आहे. याबाबत संबंधितांनी खालील नमूद बाबींची तपासणी किंवा खातर जमा करुन माहिती अद्ययावत करावी :-

१. स्वतःचे संपूर्ण नाव, पदनाम, सेवक क्रमांक, मोबाईल क्रमांक, जन्मतारीख, रक्तगट व पत्ता इत्यादी बाबी अचूक असल्याबाबत संबंधितांनी तपासावे. सदर माहितीबाबत काही त्रुटी आढळल्यास किंवा बदल करावयाचा असल्यास संबंधितांनी संबंधित प्रशासन शिक्षक कक्ष/प्रशासन शिक्षकेतर कक्षास लेखी स्वरुपात तात्काळ अर्ज करावा.

२. सदर माहिती अचूक असल्याची खातर जमा झाल्यानंतर संबंधितांनी स्वतःच्या छायाचित्राची प्रतिमा व स्वाक्षरी अपलोड करावी. (सदरचे छायाचित्र हे अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत व पांढऱ्या पार्श्वभूमीवर घेतलेले असावे, तसेच सदर छायाचित्राची प्रतिमा व स्वाक्षरी यांच्या फाइलचा आकार ५० KB ते २ MB दरम्यान असावा व फाइलचा फॉर्मेट jpg किंवा jpeg असावा.)

वरील माहिती अद्ययावत केल्यानंतर **Save** करावी, तद्नंतर **Print Privew** पाहून सदरची माहिती अचूक असल्यास, **Final Submit** या बटनावर क्लिक करावे, याची नोंद घ्यावी.

(टिप - सदर माहितीची हार्ड कॉपी प्रशासन शिक्षक कक्ष/प्रशासन शिक्षकेतर कक्षास सादर करु नये.)

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७ )
जावक क्र. एएन/ 2547 )
दिनांक : 28 JUL 2025 )

**(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवक (कार्यरत/सेवानिवृत्त) यांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.